जयहिंद!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

गणराज्य दिन...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २९ । अंक १०२ । सोमवार, दि.२६ जानेवारी २०२६ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## देशदूत
### सुटीची सुचना

**सोमवार, दि.२६ जानेवारी २०२६ रोजी गणराज्य दिनानिमित्त 'देशदूत' कार्यालयाला सुटी असल्याने मंगळवार, दि.२७ जानेवारी २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. - संपादक**

# नवीन कार घरी येण्याआधीच काळाने गाठले

## कंटेनरच्या धडकेत आजोबांसह नातवाचा मृत्यू

**पाळधी, ता.धरणगाव ।** येथील राष्ट्रीय महागार्मावर सोमवारी खेडी कढोली फाट्याजवळ दुचाकी आणि कंटेनरच्या धडकेत आजोबा आणि त्यांच्या सहा वर्षीय नातवाचा जागीच मृत्यू झाला. या हृदयद्रावक अपघातात पत्नी गंभीर जखमी झाली असून त्यांच्यावर जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत.

आनंदनगर तांडा ता. एरंडोल येथील माजी सरपंच व शिवसेनेचे तळई उत्राण गट प्रमुख देशमुख चुन्नीलाल राठोड यांनी नविन खरेदी केलेल्या कारच्या कागदपत्रांच्या कामासाठी जळगावला आले होते.ते पत्नी बेबीबाई राठोड आणि नातू परेश राठोड यांच्यासह दुचाकीने गावाकडे परतत असताना समोरून येणाऱ्या भरधाव कंटेनरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.पाळधी बायपासवरील कढोली फाट्याजवळ समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रॉलीने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती



की, दुचाकीचा चक्काचूर झाला. अपघातात चुनीलाल राठोड आणि त्यांचा नातू परेश यांचा जागीच मृत्यू झाला, तर बेबीबाई राठोड या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

अपघातानंतर ट्रॉलीचालक घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, सतर्क नागरिकांच्या मदतीने आणि पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे चालकाला ताब्यात घेण्यात आले. वाहनासह चालक सध्या पाळधी पोलीस ठाण्यात असून पुढील चौकशी सुरू आहे.

या अपघाताची माहिती मिळताच जळगाव जिल्हा रुग्णालयात नातेवाईकांनी एकच गर्दी केली होती. कुटुंबावर कोसळलेल्या या दुहेरी आघाताने परिसरात हळहळ व्यक्त होत असून,घटनेची माहिती मिळताच जि. प. सदस्य प्रताप पाटील यांनी जळगांव जिल्हा रुग्णालयात जाऊन नातेवाईकांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

## संपादकीय
### प्रजेची मूलभूत जबाबदारी

आज आपल्या देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिवस. दरवर्षी हा दिवस समाज उत्साहात साजरा करतो. करायलाही पाहिजे. जगातील सगळ्यात मोठी लोकशाही असा देशाचा जगात लौकिक आहे. तिसर्या जगातील सुमारे १३५ देशांमध्ये फक्त भारतात लोकशाही टिकून तर आहेच पण भारताचे प्रजासत्ताक दिवसेंदिवस प्रगल्भही होत चालले आहे. १९५० साली राज्यघटनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाली. जो लोकशाहीचा पाया आहे. न्याय, समानता, स्वातंत्र्य, बंधुता अशा तत्वांनी घटनेने समाजाला एकसंघ ठेवले आहे. प्रजासत्ताकच्या या संपन्न प्रवासात न्यायव्यवस्था, शासन-प्रशासन, अर्थव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, उद्योग-व्यवसाय यांची भूमिका मोलाची आहेच, पण यातील प्रजा या घटकाचे महत्व अनन्यसाधारण आहे. घटनेने लोकांना त्यांचे हक्क बहाल केले. काही जबाबदार्या देखील सोपवल्या. निवडणूक हा लोकशाहीचा पाया. त्याअर्थाने लोकशाही टिकवून ठेवण्याची, ती प्रबळ करण्याची आणि सार्थ ठरवण्याची जबाबदारी घटनेने लोकांवर सोपवली आहे. मतदानाद्वारे लोक लोकशाहीत त्यांचा थेट सहभाग नोंदवतात. सामान्यतः दर पाच वर्षांनी येणार्या निवडणुकीत एक दिवस मतदान करून ती जबाबदारी पार पाडणे हा त्याचा वरकरणी अर्थ ठरू शकेल. लोक मतदानाचा मूलभूत अधिकार बजावून सरकार निवडून देतात. जे सरकार देशाच्या वाटचालीची दिशा म्हणजेच भविष्य ठरवते. तो अधिकार लोकांनी किती सुजाणपणे वापरायला हेच यावरून लक्षात येते. घटनेलाही तेच अपेक्षित आहे. तथापि या पातळीवर अनेकदा निराशा अनुभवास येते. पान २ वर »

# पद्म पुरस्कार जाहीर

## धर्मेंद्र पद्मविभूषण, कोश्यारी पद्मभूषण



**नवी दिल्ली ।** यावर्षी तब्बल १३१ जणांना पद्म पुरस्काराने गैरवण्यात येणार आहे. ज्यामध्ये ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. अभिनेता धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.तर महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांना पद्मभूषण पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.दुसरीकडे रोहित शर्मा व हरमनप्रित कौरला पद्मश्री मिळाला आहे. कला, समाज सेवा, उद्योग, विज्ञान, वैद्यकशास्त्र आणि खेळ अशा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना पद्म पुरस्काराने गैरवण्यात आले आहे.

धर्मेंद्र सिंह देओल,केटी थॉमसन ,एन राजम ,पी नारायण ,व्ही एस अच्युतानंदन यांना



### राज्यातील पाच जणांना पद्मश्री

पद्मविभूष पुरस्कार जाहीर झाला आहे

पद्म पुरस्कारांची घोषणा झाली असून महाराष्ट्रातील अनेकांना पद्म पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. त्यामध्ये, लोकनाट्य क्षेत्रात तमाशा कलाकार रघुवीर खेडकर , कृषि क्षेत्रातील योगदानाबद्दल श्रीरंग लाड यांना यंदाच्या वर्षीचे पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत. यांसह पालघरमधील वारली संगीतकार भिकल्या लाडक्या ढिंका आणि आर्मिंदा फर्नांडीस यांनाही पद्म पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

लोकनाट्य कलाकार रघुवीर खेडकर यांचाही समावेश आहे. लोककला, लोकनाट्य जपण्यात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा सन्मान होत आहे. दरम्यान, सन २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने तमाशा क्षेत्रातील योगदानासाठीचा रघुवीर खेडकर यांच्या मातोश्री विठाबाई नारायणगावकर यांना पहिला जीवन गौरव पुरस्कार देऊन कांताबाईंचा सन्मान केला आहे. दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धाप्रसंगी कांताबाई आणि रघुवीर यांना तमाशा सदर करण्याचा बहुमान मिळाला होता.

# भ्रष्ट लोकांना जेलमध्ये टाकण्याचे काम केले!

**जळगाव ।** अहो गुलाबराव पाटील मी जिल्ह्यात अनेकांना त्रास दिला ही बाब खरी आहे मात्र भ्रष्ट गुंड लोकांना दिला. गुलाबराव मी भ्रष्ट प्रवृत्तीच्या लोकांना मोठ्या प्रमाणात जेलमध्ये टाकण्याचे काम केले, असे आ.एकनाथराव खडसे यांनी म्हटले आहे.मी त्रास दिला ही गोष्ट खरी आहे जिल्ह्यात नाही तर जिल्ह्याच्या बाहेरही गुंड आणि भ्रष्टाचार करणाऱ्यांना मी त्रास दिला आणि पुढेही त्रास देईल, असा सूचक इशारा देखील त्यांनी दिला. गुलाबराव पाटील हे विसरले असतील मी त्यांना आमदारकीतही मोठी मदत प्रचारादरम्यान केली. गुलाबराव पाटील हे त्यावेळी खूप लहान होते, असा टोलाही नाथाभाऊंनी हाणला. मला एकनाथराव खडसे यांनी खूप त्रास दिला. त्यामुळे त्यांना त्या कर्माची फळं इथेच भोगावी लागत असल्याचा दावा गुलाबराव पाटलांनी वरणगावच्या सभेत



गुलाबराव पाटलांना एकनाथराव खडसेंचा टोला

केला होता. त्यावर नाथाभाऊंनी खणखणीत प्रतिक्रिया दिली आहे. जळगाव जिल्ह्यात गिरीश महाजन आणि एकनाथराव खडसे यांच्यातून विस्तव सुद्धा जात नाही हे जगजाहीर आहे. पण शिंदेसेनेचे नेते गुलाबराव पाटील यांना अधुनमधून राजकीय फिरकी घेण्याचा मोह आवरत नाही. कालच्या कार्यक्रमातून त्यांनी धडाधड अनेक विषयांना हात घातला आणि बोलून मोकळे झाले. काल त्यांनी नाथाभाऊंना चिमटा काढला आणि आज खडसे यांनी त्यावर फिरकी घेतली.

### होय, मी भाजपाचा प्रचार केला!

गुलाबराव पाटील यांनी जिल्ह्यातील राजकारणाचा आढावा घेताना हळूच नाथाभाऊंना चिमटा काढला. मुक्ताईनगर नगरपालिकेत खरा सामना शिवसेना आणि भाजपमध्ये झाल्याचे सांगत, राष्ट्रवादीचे नेते नाथाभाऊंनी भाजपचा प्रचार केल्याचा आरोप केला. एकनाथराव खडसे यांनी मुक्ताईनगर मध्ये नगरपंचायतच्या निवडणुकीत भाजपाला मदत केली असे सांगत टीका केली. त्यावर बोलताना खडसे म्हणाले गुलाबराव पाटील एवढे वर्ष मंत्री असूनही त्यांच्या धरणगावगावच्या नगरपरिषदेत त्यांचा पक्ष निवडून आणू शकले नाही. त्यांनी आत्मचिंतन करावे असा टोला लगावला. तर खरं बोलायला काय हरकत आहे. मुक्ताईनगरच्या नगरपंचायतच्या निवडणुकीत मी भाजपला मदत केली. होय, मी भाजपला मदत केली, असे प्रत्युत्तर नाथाभाऊंनी दिले.

# आरजेडीची धुरा तेजस्वी यादवांकडे

**नवी दिल्ली ।** राष्ट्रीय जनता दलाचे सर्वेसर्वा लालू प्रसाद यादव यांनी पक्षाची पूर्ण सूत्रे आता अधिकृतपणे आपला धाकटा मुलगा तेजस्वी यादव यांच्याकडे सोपवली आहेत. पाटणा येथे पार पडलेल्या पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत तेजस्वी यादव यांची आरजेडीच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. मात्र, या नियुक्तीचा आनंद साजरा होत असतानाच लालूंची कन्या रोहिणी आचार्य यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका स्फोटक पोस्टमुळे पक्षातील आणि यादव कुटुंबातील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला आहे. गेल्या वर्षी पार पडलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत आरजेडीला मोठा फटका बसला होता. १४३ जागांपैकी पक्षाला केवळ २५ जागांवर विजय मिळवता आला. या पराभवानंतर पक्षाच्या कार्यपद्धतीवर आणि नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. लालू प्रसाद यादव यांची प्रकृती आणि आगामी निवडणुकांचे आव्हान लक्षात घेता, पक्षात राष्ट्रीय कार्याध्यक्ष हे नवीन पद निर्माण करून तेजस्वी यांची तिथे वर्णी लावण्यात आली. लालू प्रसाद यादव यांनी स्वतः तेजस्वी यांना नियुक्तीचे पत्र सोपवले. आता पक्षाचे सर्व धोरणात्मक निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार ३६ वर्षीय तेजस्वी यादव यांच्याकडे असतील.



# शिंदखेडा नगराध्यक्षांची खुर्चीच गायब

**शिंदखेडा ।** शिंदखेडा नगरपंचायत कार्यालयात नगराध्यक्षांच्या दालनातील त्यांची खुर्चीच गायब झाल्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. लोकनियुक्त नगराध्यक्ष यांची खुर्ची गायब होणे म्हणजे शिंदखेडातील तमाम जनतेचा अपमान झाला असल्याची चर्चा आहे.

आज दि. २५ रोजी नगराध्यक्षा कलावती माळी या आपल्या कार्यालयात आल्या असता त्यांच्या स्वतंत्र असलेल्या दालनात त्यांची खुर्ची गायब झाल्याचे लक्षात आले. या प्रकारामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त करत नगरपंचायतीची सीओ व प्रशासकीय अधिकारी श्रीकांत फागणेकर, सचिन वाघ यांना जाब विचारण्यात आला. नगरपंचायतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते राकेश माळी यांनी तीव्र शब्दात संबंधित अधिकाऱ्यांना सुनावले.

तुमच्याकडे खुर्ची घेण्यासाठी पैसे नसतील तर मी तुम्हाला पैसे देतो असे ऐकविले. यावेळी तर नगरसेविका यांचे प्रतिनिधी सुभाष माळी, राहुल पाटोळे, स्वीकृत सदस्य दीपक माळी अरुण देसले उपस्थित होते.

अशा प्रकारचा प्रकार शिंदखेडा नगरपंचायती प्रथमच झाल्यामुळे सर्वत्र चर्चेला उधान आले आहे. नगरपंचायतीचे मुख्याधिकारी श्रीकांत फागणेकर यांनी सांगितले की, नगरपंचायतीत विविध विषय समित्या याबाबत बैठक असल्यामुळे सदरची खुर्ची आम्ही उचलली होती. पण हा प्रकार करण्याअगोदर नगरपंचायतीने विचार करायला हवा होता आणि त्यात यापुढे असा प्रकार होणार नाही त्याची नगरपंचायत प्रशासन दखल घेईल या खुलासामुळे संतप्त झालेले वातावरण काही प्रमाणात शांत झाले.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1625 |
| नवती (२) | : 1525 |

### मिश्कीली





